आपल्या परिसरातील ताज्या घडामोडींसाठी
Deshdoot Media Group
आजच डाऊनलोड करा, देशदूतचे मोबाईल अॅप!
अॅप डाऊनलोड करण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा!


शिल्पकार विकासाचा...

# देशदूत




पान ३
ई-केवायसीत जिल्हा राज्यात दुसऱ्या स्थानी



शेवटचे पान
मराठवाडा साहित्य परिषदेचा सावानाला ग्रंथालय पुरस्कार

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | नाशिक | वर्ष ५६ । अंक ३१२ । शनिवार, दि. १९ जुलै २०२५ । पाने १२ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर






## संपादकीय

### नदी वाहती होण्यासाठी..

उत्तर प्रदेश राज्यात 'एक जिल्हा, एक नदी' असा उपक्रम राबवला जातो. त्याअंतर्गत दोन स्थानिक नद्यांचे पुनरुज्जीवन झाल्याची यशगाथा माध्यमांत नुकतीच प्रसिद्ध झाली. नून आणि पिली या त्या दोन नद्या. नून ही अठ्ठेचाळीस किलोमीटर लांबीची होती. पण विविध कारणांमुळे नदी मृतावस्थेत गेली होती. हळूहळू नाशिकची जीवनदायिनी गोदावरी नदीची अवस्था तशीच होत जाण्याची भीती तज्ज्ञ व्यक्त करतात. उपग्रहांच्या प्रतिमा, ड्रोनने केलेली सर्वेक्षणे आणि स्थानिकांच्या मदतीने नून नदीचा मार्ग शोधून निश्चित केला गेला. त्यानंतर आराखडा बनवून त्याची अंमलबजावणी केली गेली. तब्बल दोन दशकांनंतर ती नदी पुन्हा एकदा वाहती झाली. पिली नदीची कथाही याच्याच जवळपास जाणारी आहे. तज्ज्ञांच्या मते नदी वाहती करणे हा प्रयोग नाही. शास्त्रशुद्ध दृष्टिकोन, संशोधनांती बनवलेला आराखडा आणि त्यानुसार राबवली जाणारी दीर्घकालीन प्रक्रिया आहे. नाशिककरांच्या सुदैवाने गोदावरी नदी प्रदूषणमुक्त आणि बारमाही वाहती करण्यासाठी डॉ. राजेंद्रसिंह यांच्यासारखे अनेक तज्ज्ञ तयार आहेत. तेवढेच पुरेसे असते तर गोदावरीची अवस्था कधीच पालटली असती. त्यासाठी कोर्टकचेऱ्या करण्याची वेळ सामाजिक कार्यकर्त्यांवर आली नसती. कारण त्यासाठी जोड लागते ती निधी, राजकीय आणि प्रशासकीय इच्छाशक्तीची. अन्यथा अभ्यास आणि संशोधन फक्त कागदापुरते उरू शकते. गोदावरीच्या बाबतीत वारंवार तसे अनुभवास येते. साधा तिच्या पात्रातील काँक्रिट काढण्याचा मुद्दा घेतला जाऊ शकेल. ते काढण्याचे आदेश न्यायसंस्थेने किती वेळा दिले याची संख्या आणि ते अंमलात का आणले गेले नाहीत याची कारणे अधिकारी सांगू शकतील का? नून नदीच्या मोहिमेत यात सहा हजार लोक सहभागी झाले होते, असे सांगितले जाते. तेवढे लोक तर गोदावरी नदीच्या वर्षभरात सर्व मिळून पार पडणाऱ्या स्वच्छता मोहिमांमध्ये सहभागी होत असतील. लोकसहभाग हा प्रभावी विकासाचा मूलमंत्र मानला जातो. त्याला आवश्यक असते ते दिशादर्शन. एकीकृत प्रयत्नांअभावी लोकांचा सहभाग फक्त गोदावरी नदी आणि तिचा काठ यांच्या स्वच्छतेपुरता आढळतो. कोणतीही समस्या कायमची संपवण्यासाठी ती मुळापासून सोडवावी लागते. गोदावरी नदीच्या बाबतीत तेच घडते हे नाशिककरांचे दुर्दैव आहे.

**तापमान**
किमान : २२.०°
कमाल : २७.७°

# विधानसभा १४ कोटी जनतेची

## मुख्यमंत्र्यांनी आमदारांचे कान टोचले

**मुंबई । दि.१८ प्रतिनिधी**



विधानसभा ही आमदारांची, मंत्र्यांची, मुख्यमंत्र्यांची किंवा इथल्या कर्मचाऱ्यांच्या मालकीची नाही. तर ही विधानसभा राज्यातील १४ कोटी जनतेच्या मालकीची आहे. विधानसभेत समाजाला दिशा देण्याचे काम झाले पाहिजे, अशाप्रकारची अपेक्षा आहे. पण या विधानसभेत विचारातून, चर्चेतून संदेश जाण्याऐवजी लाथाबुक्क्यांचा संदेश जात असेल तर मला वाटते आपण चिंतन करण्याची आवश्यकता आहे, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी विधानसभेत दबंग आमदारांना कानपिचक्या दिल्या. शब्दातून निघणारे विष हे नागाच्या विषापेक्षा जहरी असते. त्यामुळे चर्चा, चर्चेचा स्तर यातून कटुता निर्माण होणार नाही याची काळजी घेऊन चर्चेचा स्थायीभाव हा डिस्कशन आणि डिस्कोर असाच असला पाहिजे, असेही फडणवीस यांनी सांगितले. पान १० वर

### पटोलेंनी उल्लेखलेली ती व्यक्ती काँग्रेसचीच

हनी ट्रॅपचे कुठलेही प्रकरण समोर आलेले नसून महाराष्ट्र याआधी सुसंस्कृत होता आणि आजही आहे. या प्रकरणात पटोलेंनी उल्लेख केलेली व्यक्ती काँग्रेसचीच असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. मंत्रालय, नाशिक आणि ठाणे हे हनी ट्रॅपचे केंद्र बनले आहेत. या माध्यमातून राज्यातील गोपनीय दस्तऐवज थेट असामाजिक तत्त्वांच्या हाती पोहोचत आहेत, असा आरोप नाना पटोले यांनी गुरुवारी विधानसभेत औचित्याच्या मुद्द्यावर पान १० वर

### हिवाळी अधिवेशन आठ डिसेंबरपासून

गेल्या तीन आठवड्यांपासून सुरू असलेल्या राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचे शुक्रवारी सूप वाजले. विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन ८ डिसेंबर २०२५ पासून नागपूर येथे सुरू होईल, अशी घोषणा विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी यावेळी विधानसभेत केली.

## संसदेच्या धर्तीवर नीतिमूल्य समिती



विधानभवनात गुरुवारी घडलेल्या हाणामारीची गंभीर दखल घेत यापुढे संसदेच्या धर्तीवर सदस्यांसाठी नीतिमूल्य समिती स्थापन करण्यासंदर्भातील निर्णय येत्या आठवडाभरात घेण्यात येईल, अशी घोषणा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी शुक्रवारी विधानसभेत केली. तसेच दोन्ही सदस्यांनी दिलगिरी व्यक्त करावी, अशी सूचना नार्वेकर यांनी केली.

आमदार गोपीचंद पडळकर आणि जितेंद्र आव्हाड यांच्या समर्थकांमध्ये घडलेल्या हाणामारीची गंभीर दखल घेत नार्वेकर यांनी आज विधानसभेत निवेदन केले. काल जो प्रकार घडला तो अत्यंत गंभीर आहे. विधानमंडळाच्या सीमेमध्ये अशी घटना याआधी कधीही घडली नव्हती. कोणतीही परवानगी नसताना, प्रवेशिका नसताना हे अभ्यागत संबंधित आमदारांसोबत विधानभवनात आले. या पान १० वर

### अधिवेशन काळात प्रवेशावर निर्बंध

अधिवेशन कालावधीत यापुढे सदस्य, सदस्यांचे अधिकृत स्वीय सहायक आणि शासकीय अधिकारी यांनाच प्रवेश देण्यात येईल. इतर अभ्यागतांना प्रवेश देण्यात येणार नाही. मंत्रिमहोदयांकडून वेगवेगळ्या बैठका विधानभवनात आयोजित करण्यात येतात. मंत्र्यांनी आपल्या बैठका मंत्रालयातील आपल्या दालनात घ्याव्यात. केवळ अपवादात्मक परिस्थितीतच अशा बैठकांना परवानगी देण्यात येईल, असे नार्वेकर यांनी जाहीर केले.

## ... तर शाळाही बंद करू : राज ठाकरे

**मुंबई । दि.१८ वृत्तसंस्था**



त्रिभाषा धोरणानंतर महाराष्ट्रातील वातावरण पेटले असून सरकारला शेवटी हे धोरण मागे घ्यावे लागले. त्यानंतर मुंबईत मराठी-हिंदी वाद पाहायला मिळाला. तसेच भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी मनसे पक्ष अध्यक्ष राज ठाकरे यांना आव्हान दिले होते. त्या आव्हानाला राज ठाकरे यांनी 'दुबे, तुम्ही मुंबईत येऊन दाखवा, समंदर में डुबे-डुबे कर मारेंगे' असे प्रतिआव्हान दिले. तसेच मराठीच्या मुद्यावरून थेट मुख्यमंत्र्यांना इशारा दिला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले म्हणे की, राज्यातील शाळांमध्ये त्रिभाषा सूत्री आम्ही सक्तीची करणार म्हणजे करणार. मग, सरकारला आत्महत्या करायचीच असेल तर करा. पण महाराष्ट्रात इयत्ता पहिलीपासून हिंदी सक्तीची करण्याचा तुम्ही फक्त प्रयत्न तर करून बघा, दुकानेच नाही तर शाळाही बंद करू, असा इशाराच राज ठाकरेंनी मीरा भाईंदर येथील सभेतून दिला. महाराष्ट्राचा मुख्यमंत्री हिंदीसाठी भांडतो, कोणाच्या दबावाखाली, तुमच्यावर कोण दबाव टाकत आहे? असा सवाल राज ठाकरेंनी उपस्थित केला. तसेच केंद्र सरकारकडून हा दबाव पहिल्यापासून टाकला जात आहे, काँग्रेस सरकार असतानाही तोच दबाव टाकला होता, असे म्हणत संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचा दाखला राज ठाकरेंनी दिला.

मुंबई महाराष्ट्रापासून बाजूला करण्याचा गुजराती व्यापारी आणि गुजराती नेत्यांचा डाव होता. आचार्य अत्रे यांचे पुस्तक वाचत असताना हे मला कळले. मुंबई महाराष्ट्राला मिळू नये, हे सर्वप्रथम वल्लभभाई पटेल यांनी म्हटले होते, असा इतिहासही राज ठाकरे यांनी सांगितला.



◉ कमांडिंग रिअर ॲडमिरल सुशील मेनन यांच्या नेतृत्वाखालील भारतीय नौदलाची जहाजे सिंगापूरमध्ये दाखल झाली असून त्यांचे स्वागत करण्यात आले. ही भेट सिंगापूरमधील भारतीय नौदल संबंध मजबूत करण्यासाठी आहे. भारतीय नौदल या भेटीदरम्यान सिंगापूरसोबत ३२ वी सिम्बेक्स युद्धाभ्यास देखील करणार आहे.

## तृणमूलची घुसखोरांच्या बाजूने मोहीम : मोदी

**दुर्गापूर । दि.१८ वृत्तसंस्था**

तृणमूल काँग्रेसने घुसखोरांच्या बाजूने मोहीम सुरू केली आहे आणि देशभरात तृणमूल काँग्रेसचे कट उघड झाले आहेत. पण जो कोणी या देशाचा नागरिक नाही त्याच्यावर निश्चितच कारवाई केली जाईल, असा कडक इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घुसखोरांना दिला आहे.

शुक्रवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पश्चिम बंगालमध्ये सुमारे ५,४०० कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांची पायाभरणी केली. यामध्ये तेल आणि वायू, वीज, रेल्वे आणि रस्ते यांच्याशी संबंधित प्रकल्पांचा समावेश आहे. दुर्गापूर रॅलीतील प्रचंड गर्दीला संबोधित करताना पंतप्रधान मोदींनी राज्यातील ममता सरकारवर गंभीर आरोप केले. पंतप्रधान मोदी म्हणाले की, तृणमूल काँग्रेसच्या गुंडगिरीमुळे पश्चिम बंगालमध्ये गुंतवणूक येत नाही आणि राज्याचा विकास होत नाही. आज देशासमोर तृणमूल काँग्रेसचे षडयंत्र उघड झाले आहे की, त्यांनी घुसखोरांच्या बाजूने एक नवीन मोहीम सुरू केली आहे. ते देशाच्या संवैधानिक संस्थांनाही आव्हान देत आहेत.

## सत्तेसाठी गुंडांना पवित्र स्नान : ठाकरे

**मुंबई । दि.१८ प्रतिनिधी**



विधानभवनात झालेल्या मारहाणीप्रकरणी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी उच्चस्तरीय समिती नेमली आहे. पण हे सुरू कसे झाले याच्या मुळाशी जायला हवे. सत्ता पाहिजे म्हणून गुंडांना धमकावून पक्षात घेऊन मग त्यांना गंगास्नानाने पवित्र केले जाते, अशी टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी शुक्रवारी येथे केली. लोकशाहीचा खून करणारे राजकारणी विधिमंडळात वावरायला लागले तर जनतेने काय करायचे, असा सवाल करताना सर्वपक्षीयांनी कळत न कळत गुंडांना उमेदवारी देऊन त्यांना सत्तापदे दिली असतील तर ती आधी काढून घ्यायला हवीत, अशी मागणीही त्यांनी केली.

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचे आज सूप वाजले. त्यानंतर आज पत्रकार परिषदेत बोलताना ठाकरे यांनी विधानभवन आवारात झालेल्या मारहाणीवरून सरकारवर टीका केली. हे राजकारण नसून माजकारण असल्याचा टोला लगावला.

### उद्धव ठाकरे उवाच...

- निवडणूक जाहीर झाल्यावर युतीवर चर्चा करू
- आम्ही मराठीच्या विषयावर एकत्र राहणारच.
- त्रिभाषा सूत्राचा अहवाल स्वीकारला नाही
- त्रिभाषा सूत्रावर सही केली हा प्रचार चुकीचा.
- हिंदी सक्तीचा आग्रह करणाऱ्या मुख्यमंत्र्यांनी आधी मराठी नीट वाचावी.
- शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी समिती कशाला हवी
- मुंबई तोडणाऱ्यांचे तुकडे करू

## होमगार्डच्या नशिबी उपेक्षाच !

### तुटपुंजे मानधन, अनिश्चित काम अन् दुर्लक्षित भविष्य

**नाशिक । दि.१८ भारत पगारे**



पोलीस दलाला सहाय्य करण्यासह अंतर्गत सुरक्षा व बंदोबस्तासाठी नेहमीच झोकून देणाऱ्या गृहरक्षक दलाच्या जवानांना (होमगार्डस्) मागील वर्षी मानधनाचा काहीसा लाभ झाला असला तरी त्यांच्या समोर अनंत अडचणी व समस्यांचा डोंगर वाढताच आहे. मागील वर्षी राज्यात विभागवार झालेल्या तब्बल दहा हजार जागांवरील भरतीत नाशिक शहर आणि जिल्ह्याला अनुशेषानुसार २३२ नवे होमगार्डस् मिळाले असून अल्प मानधन, अपात्र प्रकरणांसह नोटिसा व वर्षभरातील पाच महिने कामच मिळत नसल्याने होमगार्ड भरतीकडे सध्याची तरुणाई दुर्लक्ष करत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे कालानुरूप 'होमगार्ड'च दुर्लक्षित होण्याची भीती आहे.

राज्यासह नाशिकमधील पान १० वर

### या आहेत मागण्या

- होमगार्ड सेवानिवृत्तीचे वय ६२ वर्षे करण्यात यावे.
- अपात्र केलेल्यांना पुन्हा सामावून घ्यावे
- आगामी सिंहस्थासाठी कार्यरत-सेवानिवृत्त होमगार्डची मदत घ्यावी
- बाहेरील फोर्सपेक्षा कार्यरत व निवृत्त होमगार्डला प्राधान्य द्यावे
- माजी गृहरक्षक महिला, दिवंगत होमगार्ड, निराधार महिलांना सात हजार रुपये मानधन मिळावे.
- कुटुंबांना घरकुल मिळावे.

## शुक्रे समितीच्या अहवालाला आक्षेप

**मुंबई । दि.१८ प्रतिनिधी**

राज्यात सर्वच मराठा समाजाचे वर्चस्व असताना केवळ समाजाला आरक्षण मिळावे म्हणून सत्ताधारी आणि विरोधी राजकीय पक्षांनी संधान साधून राज्य मागासवर्ग आयोगाच्या अध्यक्षपदी सेवानिवृत्त न्यायमूर्ती शुक्रे यांची करण्यात आलेली नियुक्ती आणि त्या समितीच्या अहवालालाच याचिकाकर्त्यांनी जोरदार आक्षेप घेतला.

मराठा समाजाला शिक्षण आणि नोकरीत १० टक्के आरक्षणाला आक्षेप घेत राज्य सरकारच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या तसेच आरक्षणाला समर्थन देणाऱ्या सर्व याचिकांच्या अंतिम सुनावणीला आज न्यायमूर्ती रवींद्र घुगे, न्यायमूर्ती एन. जे. जमादार आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या विशेष त्रिसदस्यीय पूर्णपीठासमोर प्रारंभ झाला.

### मराठा आरक्षण : अंतिम सुनावणी सुरू

मराठा समाजाला नोकरी व शिक्षणामध्ये सामाजिक आणि शैक्षणिक मागास प्रवर्गातून (एसईबीसी) १० टक्के आरक्षण देण्याचा निर्णय तत्कालीन शिंदे सरकारने घेतला व तसा कायदा केला. तथापि, राज्यातील संपूर्ण आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडल्यामुळे मराठा आरक्षण कायद्याच्या कचाट्यात अडकले आहे. आरक्षणाला विरोध करणाऱ्या याचिकांसह तब्बल १८ याचिका दाखल झाल्या आहेत. हे आरक्षण घटनाबाह्य असल्याचा दावा याचिकांमधून करण्यात आला आहे. त्या सर्व याचिकांवर शुक्रवारी सुनावणी झाली.

याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनी सुनावणीला आक्षेप घेतला. तर राज्य सरकारच्या वतीने ॲडव्होकेट जनरल बिरेंद्र सराफ यांनी मागील सुनावणीच्या वेळी अंतरिम दिलासा देण्याबाबत सविस्तर सुनावणी झाली होती. कोणीतरी नव्याने याचिका करते आणि अंतरिम दिलासा देण्याची मागणी करते. हे सत्र सुरूच राहणार आणि मूळ प्रकरण अंतिमतः ऐकले जाणार नाही, याकडे पूर्णपीठाचे लक्ष वेधले.

नाशिक ■ नाशिक ■ जळगाव ■ धुळे ■ नंदुरबार ■ अहमदनगर येथून एकाच वेळी स्वतंत्रपणे प्रकाशित
www.facebook.com/deshdoot